बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या बद्यल
विभाग
नायर रुग्णालय दंत महाविद्यालय
आरटीआय
नियमावली क्र. 17

नायर रुग्णालय दंत महाविद्यालयातील आठ विभागा करण्यात येणार उपचार खालीलप्रमाणे

1. **<u>मुखरोग परिक्षा चिकित्सा:-</u>**
   हया विभागास सर्व नवीन रुग्णांच्या दातांचे, गालांचे व जिभेचे रोग निदान केले जाते. त्यावर योग्य त्या आवश्यक चाचण्या उदा. एक्सरे काढणे, रक्त चाचणी, मांसपेशींच्या तुकडयाची चाचणी इत्यादी करुन रुग्णास योग्य त्या विभागामध्ये पाठवून उपचार केले जातात.
   **<u>क्ष-किरण विभाग:-</u>**
   या विभागात तोंडाच्या आतील व बाहेरील भागाचे एक्सरे काढले जातात.

2. **<u>मुखहनुसुघटन शसिक्रिया आणि दात काढण्याचा विभाग:-</u>**
   या विभागात दात व जबडयांशी संबंधित विविध विकारांवर शस्त्रक्रियाद्वारे उपचार केले जातात तसेच दात काढण्याव्यतिरिक्त अक्कलदाढ काढण्याची छोटी शस्त्रक्रिया व चेह-यांच्या हाडांची पुर्नरचना करण्यासाठी आवश्यक अवघड व मोठया शस्त्रक्रिया करण्यात येतात.

3. **<u>हिरडीरोग उपचार विभाग:-</u>**
   या विभागात हिरडीरोग आणि दातांच्या हाडांशी संलग्न विकारांवर उपचार केले जातात. तसे हस्त उपकरणे आणि विद्युतचलीत उपकरणे वापरुन प्रथम दातांवरचा कचरा आणि किटाणू साफ केले जातात व हिरडी विकार असलेल्या रुग्णांच्या दातांची तपासणी करुन त्यांचे दात स्वच्छ केले जातात.

4. **<u>बालदंत उपचार विभाग:-</u>**
   या विभागात सर्व स्तरावरील नवजात शिशूपासून किशोरवयीन मुलामुलींना वेगवेगळया प्रकारचे प्रतिबंधात्मक उपचार उदा. लहान मुलांची वागणूक अथवा स्वभाव नियंत्रित करण्यापासून ते मुख आरोग्य मार्गदर्शन, आहार मार्गदर्शन, फल्युओराईड उपचार मुखरोग चिकित्सेपासून दातांत चांदी भरणे, दातांच्याच रंगाचे सिमेंट भरणे, दाताचा नसेचा ईलाज, दात काढणे इ. उपचार केले जातात. हदयरोगी मुले, मतिमंद मुले, रक्ताच्या आजारांनी गासलेली मुल आणि दुभंगलेला ओठ-टाळू असणारी मुले, संसर्गजन्य आजार तसेच एच.आय.व्ही/एडस हेपटायटीस बी बाधीत मुलांना आणि अनाथाश्रमात राहणा-या मुलांसाठी महिन्यातील एक दिवस उपचारासाठी आरक्षित करुन ठेवला जातो.

5. **<u>दंत व्यंगोपचार विभागः-</u>**

या विभागात ओठ, जबडा आणि दातांचे लहान-मोठे विचित्र आणि सुधारणे, दातांची एकमेकांवर बसण्याची चुकीची बैठक दुरुस्त करणे व दंतव्यंग आणि जबडयाचे व्यंग यावरील उपचार करणे.

6. **<u>कृत्रिम दंत विभागः-</u>**

या विभागात कृत्रिम दांत बसविले जातात. कृत्रिम दांत बसविण्यामागे तोंडाची हालचाल, बोलणे, चर्वणव दंत सौंदर्य इ. गोष्टी साध्य करणे हा उददेश असतो.

7. **<u>मुखरोग चिकित्सा व सुक्ष्मजीवशास्त्र विभागः-</u>**

या विभागात विविध रोगांमुळे मुखात उत्पन्न होणा-या व्याधींचे चिकित्सालयीन परिक्षण आणि उपचार केले जातात. तसेच मुखकर्करोग प्रतिबंध आणि निदान कक्ष सुरु करण्यात आला असून इथे पूर्वमुखकर्करोग आणि मुखकर्करोग असलेल्या रुग्णांची तपासणी केली जाते.

8. **<u>दात भरण्याचा व वाचविण्याचा विभागः-</u>**

या विभागात दातांना लागलेली किड काढून त्यामध्ये चांदी, दातांच्या रंगाचे सिमेंट भरण्यात येते. तसेच या दंत विभागात अपघाती धक्क्याने तुटलेले दात वाचवले जातात.

9. **<u>सामाजिक दंत चिकित्सा विभागः-</u>**

फिरत्या दंत चिकित्सालयाद्वारे तीन नागरी आरोग्य केंद्रात जाऊन सामाजिक दंतसेवा दिली जाते. झोपडपटटी व दूरवरच्या नागरी वस्त्यांमध्ये गरीब व गरजू जनतेला मोफत दंत उपचार मिळावेत यासाठी नियमितपणे सामाजिक दंत चिकित्सा कार्यक्रम राबविले जातात.